# निविदा नमुना

दिनांक :

प्रति,
उप सचिव (कार्यासन-१४२३),
नियोजन विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई- ४०० ०३२.

**विषय :-** नियोजन विभागातील निर्लेखित केलेल्या वाहनाची विक्री करणेबाबत.
**संदर्भ :-** नियोजन विभागाची समक्रमांकाची दिनांक १७ ऑगस्ट, २०२१ ची निविदा सूचना.

महोदय,

| अ.क्र. | निविदा क्रमांक: | (कार्यालयासाठी राखीव) |
|---|---|---|
| १ | निविदाधारकाचे नाव | |
| २ | निविदाधारकाचा संपूर्ण पत्ता, दूरध्वनी/ मोबाईल क्रमांक | |
| ३ | निविदाधारक कंपनी असेल तर कंपनीचा संपूर्ण पत्ता व दूरध्वनी क्रमांक | |
| ४ | जी.एस.टी. क्रमांक (असल्यास) | |
| ५ | निविदा नमुना शुल्क रुपये १००/- भरलेली पावती क्रमांक व दिनांक | |
| ६ | निविदा सादर करावयाचा दिनांक | मंगळवार, दिनांक १७/०८/२०२१ ते दिनांक २५/०८/२०२१ या कालावधीत कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी दुपारी २.३० ते दुपारी ४.३० पर्यंत. |
| ७ | निविदा उघडण्याचा दिनांक | निविदाधारकांना स्वतंत्रपणे कळविण्यात येईल. |

नियोजन विभागाची निविदा सूचना क्रमांक : वाहन-१३१६/प्र.क्र.४२ /का-१४२३, दिनांक १२ ऑगस्ट, २०२१ अन्वये, नियोजन विभागातील निर्लेखित केलेले वाहन क्र. **"एमएच-२६-आर-१००१ (हुंदाई अॅसेंट)"** ची विक्री करण्यासंदर्भात महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर दिनांक १७ ऑगस्ट, २०२१ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली निविदा नमुना व त्यासोबत जोडलेल्या अटी व सूचनांनुसार मी/आम्ही वाहन क्र. **"एमएच-२६-आर-१००१ (हुंदाई अॅसेंट)"** हे रुपये ----------------/- (अक्षरी रुपये ------------------ --------------- फक्त) एवढी किंमत देऊन खरेदी करु इच्छीतो.

मी/आम्ही नियोजन विभागामार्फत विक्री करण्यात यावयाच्या वाहनाची पाहणी केली आहे. या प्रक्रीयेकरीता विहित केलेल्या अटी व शर्ती मला/आम्हाला मान्य आहेत.

आपला,

निविदा सादर करणाऱ्याचे /संस्थेचे नाव

**सोबत:-** निर्लेखित साहित्य/वस्तू विक्री करण्यासंदर्भात नियम, अटी व शर्ती.

**(कृ.मा.प.)**

टिप:- सदर निविदेसाठी आपली निवड झाल्यास कार्यालयीन कामकाजाच्या ५ दिवसाच्या आत नियोजन विभाग (रोखशाखा), दालन क्र.६५४ (विस्तार), मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ येथे देकाराची रक्कम भरावी व वाहनाचा ताबा घ्यावा.

# <u>नियोजन विभागातील निर्लेखित वाहनाच्या विक्रीबाबत नियम, अटी व शर्ती.</u>

१. नियोजन विभागातील निर्लेखित केलेले वाहन क्र. **"एमएच-२६-आर-१००१ (हुंदाई ॲसेंट)"** हे निविदा पध्दतीने **जेथे आहे व जसे आहे तसे** तत्वावर विक्री करणे आहे.

२. उपरोक्त वाहन विधानभवन इमारतीसमोरील मैदान, नरीमन पॉईंट, मुंबई येथे पाहणीसाठी इच्छुक खरेदीदारांना पाहता येईल.

३. निविदा नमुना अर्जाची किंमत रुपये १००/- आहे. ज्या इच्छुक खरेदीदारास सदर वाहन खरेदी करावयाचे आहे त्यांनी कक्ष अधिकारी, नियोजन विभाग, कार्यासन-१४२२ (रोखशाखा), दालन क्र. ६५३ (विस्तार),मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,मुंबई- ४०० ०३२, यांच्याकडे **दिनांक १७/०८/२०२१ ते दिनांक २५/०८/२०२१ या कालावधीत दुपारी २.३० ते ४.३० या वेळेत रुपये १००/- (ना-परतावा) भरणा करुन त्यांचेकडून रकमेची पावती व निविदा नमुना अर्ज प्राप्त करावा अथवा,** "Desk Officer, Planning Department " **यांच्या नावे पुढील बँक खात्यावर रु.१००/- चा ऑनलाईन भरणा करुन शासनाच्या** <u>https://www.maharashtra.gov.in</u> **या संकेतस्थळावरुन निविदा नमुना अपलोड (Upload) करावा.**

**Bank Name : Indian Bank**
**Account No.: 416199377**
**IFSC code : IDIB000N052**

४. इच्छुक खरेदीदाराने खरेदी करावयाच्या वाहनाचा खरेदीचा दर (देकार) विहित निविदा नमुन्यामध्ये सुस्पष्ट नमूद करुन " Section Officer, Planning Department " **यांच्या नावे रुपये २०००/- (अक्षरी रुपये दोन हजार फक्त) च्या <u>अनामत रकमेच्या</u> डिमांड ड्राफ्टसह सिलबंद लिफाफ्यात दिनांक १७/०८/२०२१ ते दिनांक २५/०८/२०२१ या कालावधीत दुपारी २.३० ते ४.३० या वेळेत** कार्यासन अधिकारी (कार्यासन-१४२३),नियोजन विभाग, दालन क्र. ६४६ (विस्तार),मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,मुंबई- ४०० ०३२ या कार्यालयात समक्ष सादर करावेत. **निविदा अंतिमरित्या सादर करण्याचा दिनांक २५/०८/२०२१ दुपारी ४.३०** वाजेपर्यंत राहील. दिनांक २५/०८/२०२१ नंतर विहित वेळेनंतर सादर केलेल्या व पोस्टाने पाठविलेल्या निविदा स्विकारल्या जाणार नाहीत. यास्तव, आपली निविदा वरील कार्यालयात अंतिम दिनांकापूर्वी व वेळेत पोहोचविण्याची जबाबदारी संबंधित निविदाधारकाची राहील. याबाबत कोणतीही तक्रार स्विकारण्यात येणार नाही. वाहनाची कागदपत्रे वरील ठिकाणी पाहणीसाठी उपलब्ध आहेत.

५. सदर विक्री ही निविदा पध्दतीने करण्यात येणार असल्याने निविदेच्या बंद लिफाफ्यावर **<u>" निर्लेखित वाहनाच्या खरेदीसाठी निविदा "</u>** असे स्पष्ट नमूद करुन उप सचिव (कार्यासन-१४२३) यांच्या नावे निविदा सादर करण्यात यावी. **निविदाधारकाने निविदा अर्जासोबत उपरोक्त अ.क्र.३ व ४ येथे नमूद केलेली निविदा नमुना अर्जाचे शुल्क भरल्याची मूळ पावती/ऑन लाईन भरणा केल्याची पावती व अनामात रकमेचा डिमांड ड्राफ्ट जोडणे आवश्यक आहे. अन्यथा, निविदा ग्राह्य धरली जाणार नाही.**

६. निविदाधारकाकडून **निविदा सादर करताना** पॅनकार्ड/ आधारकार्ड यांची प्रत स्वतंत्ररित्या (लिफाफ्यात बंद न करता ) घेण्यात येईल.

७. निविदा उघडण्याचा दिनांक व वेळ निविदाधारकांना स्वतंत्ररित्या कळविण्यात येईल. निविदा उघडण्याच्या विहित दिनांकास व वेळेस संबंधित निविदाधारकास किंवा त्याच्या प्रतिनिधीस व्यक्तीश: उपस्थित राहता येईल. संबंधित निविदाधारक अनुपस्थित राहील्यास सदर निविदा उपस्थित निविदाधारक/प्रतिनिधींसमोर उघडण्यात येईल. कोणताही निविदाधारक उपस्थित न राहील्यास त्यांच्या अनुपस्थित निविदा उघडण्यात येतील. याबाबत अनुपस्थित निविदाधारकांची कोणतीही तक्रार स्विकारण्यात येणार नाही.

८. सर्वात जास्त रकमेची निविदा सादर करणाऱ्या निविदाधारकास सदर निविदा प्रक्रीयेमध्ये "यशस्वी निविदाधारक " म्हणून घोषित करण्यात येईल.

९. यशस्वी निविदाधारकाने मंजूर निविदा रकमेतून अनामत रक्कम वजा जाता **उर्वरित रकमेचा कार्यालयीन कामकाजाच्या ५ दिवसात " कक्ष अधिकारी, नियोजन विभाग, कार्यासन-१४२२ (रोखशाखा), दालन क्र. ६५३ (विस्तार),मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,मुंबई- ४०० ०३२," यांच्याकडे रोख किंवा डिमांड ड्राफ्ट स्वरुपात भरणा करणे आवश्यक राहील.** अन्यथा, त्याची निविदा रद्दबातल ठरविली जाईल व उपरोक्त **अ.क्र. ८ मध्ये नमूद केलेल्या निवड प्रक्रीयेतील द्वितीय क्रमांकाच्या निविदाधारकास यशस्वी निविदाधारक म्हणून घोषित करण्यात येईल.**

१०. यशस्वी निविदाधारकाने निविदेची रक्कम भरणा केल्यानंतर **एक आठवड्यात** सदर वाहन आहे त्या ठिकाणावरुन स्वखर्चाने ताब्यात घेणे आवश्यक राहील. त्यासाठी नियोजन विभागामार्फत कोणतेही मनुष्यबळ किंवा इतर खर्च देण्यात येणार नाही. तसेच, निविदा मंजूरीनंतर **सदर वाहन वाहतूक करताना/ताब्यात घेताना आवश्यक असलेले शुल्क/कराचा भरणा किंवा अनुषंगिक खर्चाची जबाबदारी संबंधित निविदाधारकाची राहील.**

११. यशस्वी निविदाधारकाने निविदा मंजूरीनंतर कोणत्याही कारणास्तव वाहन ताब्यात घेण्यास नकार दिल्यास त्याने जमा केलेली अनामत रक्कम जप्त करुन शासन जमा करण्यात येईल व सदर रक्कम कोणत्याही परिस्थितीत संबंधित निविदाधारकास परत करण्यात येणार नाही.

१२. निविदेबाबत निविदाधारकाची कोणतीही अट/शर्त स्विकारली जाणार नाही.

१३. कोणतेही कारण न देता निविदा प्रक्रीया कोणत्याही टप्प्यावर थांबविणे किंवा नाकारण्याचे पूर्ण अधिकार अपर मुख्य सचिव (नियोजन), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांनी राखून ठेवले आहेत.

| अ.क्र. | निविदा प्रक्रीया तपशिल | कालावधी |
|---|---|---|
| १. | महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर निविदा प्रसिध्द झाल्याचा दिनांक | दि. १७/०८/२०२१ |
| २. | निविदा नमुना अर्ज मिळण्याचा कालावधी (कार्यालयीन दिवशी) | दि.१७/०८/२०२१ते दि. २५/०८/२०२१ दुपारी २.३० ते ४.३० |
| ३. | निविदा सादर करण्याचा कालावधी (कार्यालयीन दिवशी) | दि.१७/०८/२०२१ते दि. २५/०८/२०२१ दुपारी २.३० ते ४.३० |
| ४. | निविदा अंतिमरित्या सादर करण्याचा दिनांक व वेळ | दि. २५/०८/२०२१ दुपारी २.३० ते ४.३० |
| ५. | निविदा उघडण्याचा दिनांक व वेळ | निविदाधारकांना स्वतंत्ररित्या कळविण्यात येईल. |

# महाराष्ट्र शासन

नियोजन विभाग, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

१. वाहन निर्लेखन आदेश क्र. : वाहन-१३१६/प्र.क्र.४२/का.१४२३, दिनांक १५ मे, २०१९ चे आदेश व समक्रमांकाचे दिनांक ४ फेब्रुवारी,२०२० चे शुध्दीपत्रक.

२. निविदा सादर करण्याचा अंतिम दिनांक : दिनांक २५ ऑगस्ट, २०२१.

| अ.क्र. | विक्री करावयाच्या निर्लेखित वाहनाचा तपशिल | |
|---|---|---|
| १. | वाहन खरेदीचा दिनांक | माहे एप्रिल, २००७ |
| २. | रजिस्ट्रेशन क्रमांक | MH-26-R-1001 |
| ३. | चासीस क्रमांक | MALCG 41GR7M175691 |
| ४. | इंजिन क्रमांक | G4EB7M172267 |
| ५. | उत्पादक कंपनी | Hyundai Motors |
| ६. | वाहनाचा प्रकार | Accent GLE (Petrol) |